# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**<u>अत्यंत तातडीचे/महत्वाचे</u>**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/९७/२०२३
दिनांक : २८/०२/२०२३

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय :** **शैक्षणिक सत्र २०२२-२३ करीता सर्व अभ्यासक्रमाला नियमित / माजी विद्यार्थ्यांचे उन्हाळी-२०२३ करीता सर्व अभ्यासक्रम परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याबाबत. (**CBCS Pattern **अभ्यासक्रमाचे नियमीत विद्यार्थ्यांचे सत्र २ व माजी विद्यार्थ्यांचे सत्र १ तसेच** BE,B.Tech,B.Text **व** B.Arch **सत्र १, २ व ३,** B.Pharm **सत्र १ व ३ आणि** LLB **सत्र १ अभ्यासक्रमाच्या परीक्षा वगळून)**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र २०२२-२३ करीता सर्व अभ्यासक्रमाला नियमित / माजी विद्यार्थ्यांचे उन्हाळी-२०२३ करीता सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाचे आहेत.

**सर्व अभ्यासक्रमातील नियमीत / माजी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र दिनांक ०३/०३/२०२३ ते १३/०३/२०२३ पर्यंत ऑनलाईन भरावयाचे आहे.**

ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करावयाची आहे.

**<u>ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे :-</u>**

१) विद्यार्थ्यांनी आपले ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र त्यांना महाविद्यालयाने वितरित केलेल्या Login ID आणि Password द्वारेच भरण्यात यावे. (हिवाळी-२०२२ परीक्षेकरीता ज्या Login ID आणि Password ने ऑनलाईनद्वारे परीक्षा आवेदनपत्रे भरले असतील, त्याच Login ID आणि Password ने ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरावे.)

२) विद्यापीठाद्वारे तयार करण्यात आलेल्या नियमित विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password महाविद्यालयाने त्यांच्या पोर्टलमध्ये Login करुन सर्व विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password Student Login Details या Panel वरुन परीक्षेनिहाय उपलब्ध करुन घ्यावेत, व विद्यार्थ्यांना वितरित करण्यात यावे.

३) Panel वर उपलब्ध झालेल्या विद्यार्थ्यांचे Login ID आणि Password महाविद्यालयातील सर्व संबंधीत विद्यार्थ्यांना पुरविण्यात यावेत. परंतु विद्यार्थ्याचा Login ID आणि Password त्याच विद्यार्थ्याला देण्यात यावा. इतर विद्यार्थ्यांना त्याचा Login ID आणि Password माहिती होणार नाही, याबाबतची दक्षता महाविद्यालयाने घ्यावी.

४) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या Login ID आणि Password द्वारे **https://sgbau.ucanapply.com** या संकेतस्थळावर जाऊन Student या Tab वर Click करुन आपल्या Login ID आणि Password ने Login करुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्यात यावे. व विद्यार्थ्यांनी सदर भरलेल्या परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून परीक्षा शुल्कासह महाविद्यालयात जमा करावी. **{विद्यार्थ्यांनी आवेदनपत्राची Print out काढून महाविद्यालयात जमा न केल्यास विद्यार्थ्यांना परीक्षा क्रमांक (Roll No.) प्राप्त होणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.}**

५) विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र ऑनलाईन भरल्यानंतर व विद्यार्थ्याकडून परीक्षा आवेदनपत्राची Print out काढून व परीक्षा शुल्क प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने Student Verification या Panel वर जाऊन संबंधीत परीक्षेची माहिती भरुन Form Type या Option ला प्रेस करुन Exam Form Select करुन विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्रे Verified करणे अनिवार्य राहील. (महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे Verified केल्याशिवाय परीक्षा क्रमांक (Roll No.) जनरेट होणार नाही, याची नोंद घ्यावी.)

६) महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र Verified करुन विद्यार्थ्यांची यादी Report Section मधून Student Verification मध्ये जाऊन Exam Form Select करुन विद्यार्थ्याने ऑनलाईन परीक्षा आवेदन पत्र भरल्याची यादी काढावी.

७) Verification झाल्यानंतर परीक्षा आवेदनपत्रांची यादी विहित केलेल्या परीक्षा शुल्कासह व विहित केलेल्या तारखेच्या आंत विद्यापीठात सादर करावी. (महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे परीक्षाआवेदनपत्राची Print out विद्यापीठात जमा करु नये.)

८) उन्हाळी-२०२३ करीता नियमित / माजी विद्यार्थ्यांनी जर ऑफलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर केली असतील, तर ती स्वीकारण्यात येणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. त्याकरीता नियमित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे अत्यावश्यक आहे.

**(टिप-**

१. **एम.एस्सी. परीक्षेकरीता बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑफलाईन पद्धतीने संबंधीत महाविद्यालयामार्फत विद्यापीठामध्ये दिनांक २० मार्च, २०२३ पर्यंत सादर करावीत.**

२. दिव्यांग विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयाने स्वतंत्रपणे विद्यापीठामध्ये सादर करावी.

३. विद्यार्थ्याचा Login ID आणि Password हा विद्यार्थ्याच्या मुळ महाविद्यालयातूनच उपलब्ध होईल.

४. जर एखाद्या नियमीत विद्यार्थ्यांने मागील परीक्षेकरीता नियमीतसाठी परीक्षा आवेदनपत्र भरले नसेल अश्या विद्यार्थ्यांने उन्हाळी-२०२३ परीक्षेकरीता नियमीतच्या ऐवजी माजी म्हणुन ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्र भरावे व महाविद्यालयाने अश्या विद्यार्थांचे अंतर्गत सत्र गुण सविस्तरपणे पत्राद्वारे विद्यापीठात सादर करावे.

**५. नियमित व माजी विद्यार्थ्यांचे कोणत्याही परीक्षांचे परीक्षा आवेदनपत्रे (बहिःशाल विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे वगळून) विद्यापीठ किंवा महाविद्यालयात ऑफलाईन पद्धतीने (ग्रीन फॉर्म) व तसेच पोस्टाने / कुरीअरव्दारे स्वीकारण्यात येणार नाही.**

**६. B.Ed, BPED व BPES या अभ्यासक्रमाच्या सत्र २ च्या नियमीत विद्यार्थ्यांनी उन्हाळी-२०२३ करीता परीक्षा आवेदनपत्रे दिलेल्या तारखेत ऑनलाईन भरावे.**

उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला,

प्र.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ